IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# जाणिवा जाग्या होताना: स्त्रियांच्या कार्य आणि कर्तृत्वाचा इतिहास

**प्रा. डॉ. कल्याणी शेजवळ**
अंबिकाबाई जाधव महिला महाविद्यालय,
वज्रेश्वरी ता. भिवडी जि.ठाणे

भारतीय स्त्रियाचा इतिहास जाणुन घेताना, प्रत्येक काळातील स्थितंतरे माहित असणे जसे आवश्यक आहे. त्याप्रमाणे त्या कालखंडातील शैक्षणिक, सामाजिक परिस्थिती, राजकीय व्यवस्था,, धार्मिकस्थिती, आर्थिक व्यवस्था, देशावर झालेली आक्रमणे, वाढीस लागलेले धर्म, प्रत्येक काळातील राजे, त्याचा राजव्यवहार, त्यानी धर्माला दिलेले राजाश्रय, धर्मात केलेला प्रवेश, वाढीस लागलेले कर्मकांड, स्त्री बंधनाने निर्माण झालेली कोंडी, भारतात विविध आधारावर निर्माण झालेली विषमता आणि भेदाभेद, इंग्रजाचे आगमन, ना कोणता मानवाधिकार, ना कोणता कोणती मुल्य, ना मानवी प्रतिष्ठा अशा वेळी स्त्रियानी जो लढा दिला, संघर्ष केला त्याचा आलेख लेखिकेने 'जाणिवा जाग्या होताना' हे पुस्तकात मांडला आहे,

'जाणिवा जाग्या होताना'पुस्तक एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या एस.वाय.बी.ए. च्या अभ्यासक्रमाला लावलेले पुस्तक आहे. हे पुस्तक 'सुरेश एजन्सी, या प्रकाशनाने प्रकाशित केले असून जीवनाच्या विविधतेला समजून घेणाऱ्या स्वतंत्र आणि निर्भय जाणिवांना ते अर्पण केले आहे. हे पुस्तक 2019 साली यवतमाळ येथे होणाऱ्या 92 व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अरूणा ढेरे यांनी लिहिले आहे. बालपणापासून साहित्य आणि समीक्षेचा वारसा मिळाल्याने प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने बघून त्यातील मर्म, सखोलता जाणून घ्यायची कला अवगत झाली होती. त्याच्या कथा, कादंबऱ्या, कविता, ललित लेख, अनुवाद, समीक्षा, संपादक.....इ. अनेक साहित्यप्रकार त्यांनी हाताळले आणि लिखित असून त्यातून त्याच्या प्रतिभेची चमक दिसून येते. एखाद्या गोष्टीकडे त्या जेव्हा गंभीरतेने बघतात व गांभीर्याने विचार करतात, तेव्हा त्याच्या बुध्दीमधील चुणूक, बहुआयामी व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्वाचा प्रत्यय येतो. त्यांचा 'विस्मृतीचित्रे, हा ग्रंथ लोकप्रिय अस ग्रंथात त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील विशेष कारकिर्द घडविलेल्या स्त्रियांच्या कार्य आणि कर्तृत्वाचा आढावा घेतला आहे.

लेखिका म्हणते, 'ज्ञान हे जसे मानवी संस्कृतीच्या विकासाचे मुलकारण साधन आहे, तसे ते मानवी स्वांत्र्याचे मुलकारण आहे. मानवी जीवन आणि जीवनसंघटन यांच्याविषयीचे ज्ञान बाहयसृष्टीच्या ज्ञानासमवेत जितके विस्तारत जाते, तितकाच मानची स्वांत्र्याचा परिघही विस्तारला जातो. हे ज्ञान स्त्री पुरुष सर्वानाच आवश्यक आहे. ज्ञानार्जनाच्या सामाजिक व्यवस्थेमघील लिंगभेदावर आघारीत विषमता अन्याय तर आहेच; पण मानवी प्रगतीला घातकही आहे.''1 या लेखांचा हा मुख्य मुलाधार आहे. या लेखाची मांडणी पुढील विचारावर केली आहे. ''शिक्षण हे ज्ञानापर्यंत पोहोचण्याचं महत्त्वाचं साधन आहे. पण ते नसतानाही स्त्रियांनी जो विचार केला, त्यासाठी जो संघर्ष केला त्यात अनुभवाचाही मोठा वाटा आहे. म्हणूनच शिक्षण न घेताही अनेक जणींनी ज्ञान मिळावलं. कुठे–कुठे नजरेआड राहिलेलं, धुळ खात पडलेलं, अपघाताने सापडलेलं असं विचारधन लेखिकेने एकत्रितपणे निवडक स्वरूपात या पुस्तकातून आपल्या हाती दिले आहे. आपली खरी समृध्द वैचारिक स्त्री परंपरा त्यामुळेच आपल्या पर्यंत पोहोचली आहे''.2

**वेदकाळातील स्त्रिया** : गार्गी, मैत्रेयी.

**महाभारतातील स्त्रिया** : द्रौपदी

**थेरीगाथातील स्त्रिया** : गौतमी, विमला, पुर्णिका.

**संत स्त्रिया** : ओव्वे, मिरा, लल्ला, अक्का महादेवी, सत्यवती, जनाबाई, सोयराबाई, बहिणाबाई.

**मराठयांच्या इतिहासातील पराक्रमी स्त्रिया** : राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई, गोपिकाबाई पेशवे, अहिल्याबाई होळकर,

**शिक्षणासाठी संघर्ष आणि शिक्षण प्रचार आणि प्रसार करणाऱ्या स्त्रिया** : सावित्रीबाई फुले, जाईबाई चौधरी. पडिता रमाबाई, विठाबाई चौधरी, मथुराबाई जोशी, रमाबाई रानडे, सावित्रीबाई रोडे, ताराबाई शिंदे, रूकैय्या हुसेन, शेवंताबाई निकंजे, जनाक्का शिंदे.

**साहित्यिक स्त्रिया** : इरावती कर्वे, दुर्गा भागवत, मालतीबाई बेडेकर, कुसुमावती देशपांडे, ताराबाई शिंदे, बहिणाबाई चौधरी.

'जाणिवा जाग्या होताना' या पुस्तकात त्यांनी प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या जीवन आणि कार्याचा आढावा घेतला आहे. एकूण 105 पानांमध्ये लेखिकेने स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा खुप मोठा पट आपल्या समोर मांडला आहे. पंचवीस शतकांच्या स्त्रियांच्या वाटचालीतून एकूण पंचेचाळीस स्त्रिया निवडणं तसं अवघडच काम म्हणता येईल, कारण कर्तृत्ववान सर्व स्त्रिया शोधून त्यांना त्याच्या कार्याचा उहापोह करताना काही सुटणे अपरिहार्य आहेच. परंतु, तरीही नेमक्याच स्त्रिया शोधून त्या काळची सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक व्यवस्था नकळतपणे उलगडली आहे. स्त्री जन्म, तिचं जगणं, तिच्या व्यथा, वेदना, तिची शारिरीक, मानसिक, बौध्दिक ताकद आणि तिच्याकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन, सर्व बंधने झुगारून दाखवते. आपल्या सिध्द झालेली स्त्री काळाचा मोठा पट उलगडून अरूणा ढेरे यांच्या जाणिवा जाग्या होतानाचा अभ्यास करताना त्यांच्या 'विस्मृती चित्रे' या पुस्तकाची आठवण होते. त्या म्हणतात, ''अर्थात सुधारकांना स्त्री शिक्षण केवळ औपचारिक शालेय शिक्षण अपेक्षित नव्हते. लेखिकेच्या मते, स्त्री ला मोठया समाजाशी, राष्ट्राशी आणि एकूणच जगाशी जोडून देण्याची ती सुंदर प्रक्रिया होती. या प्रक्रियेत उतरलेल्या स्त्रियांनी सहकारी पुरूषाचा हात धरून जगाकडे जाणतेपणाने पाहिले. आपणंच आपली ओळख करून घेतली. आपल्या मर्यादेची आणि सामर्थ्याची जाण त्यांना येत होती. सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्याच आत्म्याला त्यांना स्पर्श करता आला. या स्पर्शाने ज्यांना नवचैतन्य मिळाले, अशा स्त्रिया समाजाच्या विविध क्षेत्रात जेव्हा आत्मविश्वासाने सावरू लागल्या तेव्हा स्त्रित्वाच्या या दर्शनाने समाज मन भारले गेले. अशा स्त्रियांचे दर्शन वीस प्रकरणांतून होते.''3

या संदर्भात आ.ह.साळुंके यांच 'हिंदु धर्म आणि स्त्री' हे पुस्तक त्या काळातील स्त्री – पुरूष विषमतेचं ??? दर्शन घडवतं. इथे पुस्तकाचं तपशील देण्याचं कारण हे की, वेदकाळापासून पुरूष शिकत, वाढत राहतील अशी व्यवस्था भारतात आहे. स्त्रियांच्या सुविधा नसताना आणि इतर कौटुंबिक, सामाजिक, जातीय, धर्मिय अशा अनंत प्रकारच्या अडचणी असताना त्या पार करत स्त्रिया नेहमीच विचार करत आल्या आहेत. शिक्षणाचा विचार सर्वसामान्य पुरूषाप्रमाणे स्त्रियांसाठी गेल्या दोनेक दशकात रूजत गेला. त्यामुळे या आधी त्याच्या नावावर ना ग्रंथ, ना तत्वज्ञानाचे अभ्यास जमा झाले. शिक्षण हे ज्ञानापर्यंत पोहोचण्याचं महत्वाचं साधन आहेच, पण ते नसतानाही स्त्रियांनी जो विचार केला, त्यासाठी जो संघर्ष केला, त्या अनुभवाचा वाटा ही मोठा आहे. म्हणूनच शिक्षण न घेताही अनेक जणींनी ज्ञान मिळवले. कुठे कुठे नजरेआड राहिलेलं, धुळ खात पडलेलं अपघाताने सापडलेलं असं विचारधन लेखिकेने आपल्या हाती दिलं आहे, हे नाकारता येणं शक्य नाही.''4

''जाणिवा जाग्या होतात'' या पुस्तकातील वाक्आम्भृणी, गार्गी, सुलभा या लेखातून लेखिकेने स्त्रियांजवळ असणाऱ्या विचारक्षमतेचे, सामर्थ्याचे, बौध्दिकक्षेतेचे चित्रण या ब्रम्हवादिनीच्या रूपाने केले आहे. सुलभा गार्गी, वाक्आम्भृणी, शाश्वत सुख शोधणारी मैत्रेयी, अरण्यपर्वात पंडित विशेषण लाभलेली द्रौपदी, यासर्व विघेमधे पारंगत होत्या. इ.स. पूर्व 500 च्या पूर्वीचा कालखंड हा वेदकाळ समजला जातो. या काळात स्त्रियांना बरेच स्वातंत्र्य होते. गार्गी, मैत्रेयी..... इत्यादी उदाहरणे आपल्या स्त्रिया सार्वजनिक कार्यक्रमात, वादविवादात भाग घेत असत. श्रेष्ठ दार्जाच्या काळात आर्यांच्या काळात स्त्रियांना ही हक्क आणि अधिकाराचे स्वातंत्र्य होते. ''वेदकाळात स्त्रियांमध्ये दोन प्रकार रूढ होते असे दिसते. एक म्हणजे ब्रम्हवादिनी.या स्त्रिया वेदाचा अभ्यास करीत. व्यासंगी असत, प्रौढावस्ते पर्यंत त्या लग्न करीत नसत व कधी–कधी तर त्या जन्मभर अविवाहित रहात. ब्रम्हवादिनींच्या उज्वल मालिकेतील पहिली श्रेष्ठ स्त्री 'वाच' होती. महाकाव्य लिहिणारी गंगादेवी; घोषा, सूर्या, शची, गार्गी, मैत्रेयी, वाचक्नवी, सुलभा या विद्वान स्त्रिया अशा प्रकारच्या व्यासंगी होत्या. त्यांनी चर्चेमध्ये ऋषीमुनींनाही लाजवले होते, असे आपण ऐकतो. उभयभारती बरोबर वाद करताना शंकराचार्यांसारखा प्रकांड पडितांनाही वेळ मागून घ्यावा लागला होता. लोपामुद्रा, रोमशा या सारख्या तपस्वीनींबद्दल समाजामध्ये आदरभाव होता. दुसरा वर्ग सामान्य स्त्रियांचा. त्यांना सद्योदवाह म्हणत. या स्त्रिया काही शिक्षण घेत, परंतु त्या गृहिणी असत.''5

बौध्द धर्मात प्रवेश केलेल्या भिखुणीच्या थेरी गाथेत झालेल्या नैतिक सच्चेपणा, सुख–दुःखांचा भावावेश आणि निर्वाणातल्या परम शांतीचा तृप्त मभुवनाची माहिती दिली आहे. संत साहित्याची जगभर असणारी अखंड परंपरेचे चित्रण करताना संत स्त्रियांच्या आयुष्यात कसे बदल घडले. अध्यात्म आणि परमार्थाच्या मार्गावर चालत असताना समाजाकडून होणारा त्रास, छळ, द्वेशाची भावना यांचा विचार न करता शांतपणे जीवन मार्गक्रमण करणाऱ्या जनाबाई, सोयराबाई, ओळे, सत्यवती, मीरा, लल्लाच्या आयुष्यातील प्रसंग घटनेचे वर्णन करतात. पहिला स्त्रीवादांचा हुंकार मांडणाऱ्या थेरी आणि थेरीगाथा ब्रम्हवाहिनी तामिळनाडूतील ओव्वै, वीरशैव संप्रदायातील अक्का महादेवी, कनार्टकातील सत्यवती, नामयाची जनी, चोख्याची महारी, नाममुद्रेने लेखन करणारी सोयराबाई, तुकारामांना बहिण मानणारी बहिणाबाई आध्यात्मिक मार्गाचा स्वीकार करताना त्यानां झालेल्या स्त्री जाणिवाची जाणीव व्यक्त होताना दिसते. त्यासाठी संत जीवनातील अनेक घटना प्रंसगाचे वर्णन लेखिकेने केले आहे. त्यावरुन समाज उपेक्षित

नजरेने कसा बघतो, हिणवतो हे लक्षात येते. मात्र येथे तारा भवाळकर याचे मत महत्वाचे वाटते. त्या म्हणतात; पतीजवळ राहुन जिने संतांना अभिप्रेत अशा मुक्तीमार्गाची वाट चोखाळली आहे, अशी स्त्री संत आढळत नाही.''6 हे 'स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर' मधील तारा भवाळकराचे निरीक्षण यथार्थ आहे.

मराठयांच्या इतिहासातील राजकीय कर्तबगारी गाजविणाऱ्या स्त्रियानी नवा इतिहास घडविला आहे. इतिहासातील पराक्रमी स्त्रिया राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई, गोपिकाबाई पेशवे, अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा परामर्श घेताना जिजाबाईच्या रुपाने आदर्श माता येते. उतरत्या काळात मराठेशाहीचे व्यवस्थापन करत उत्तरदायित्वाचे कुशल प्रशासक अहिल्याबाई होळकर, राजकारणातील छुपेपणा ओळखुन राजकारभार करणाऱ्या गोपिकाबाई पेशवे, मुघलाविरुघ संघर्ष महाराणी ताराबाई,चोखपणे राज्यकारभार साभांळतात. पतीच्या प्रशासनाची उणीव त्या व्यवस्थित निभावतात.

सत्यशोधक विधादेवी, फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा वारसा चालविणाऱ्या, सावित्रीबाई रोडे यांनी त्यांना झालेंल्या त्रासातुन मार्गक्रमण करत शाळा स्थापन केली, त्याचे शैक्षणिक व सामाजिक कार्य रामोशी समाजाराठी महत्वाचे योगदान ठरले आहे. समाजात वाचनाची आवड निर्माण होणेसाठी वाचनालये स्थापन केली. समाज जागृत होणेसाठी मासिके तयार केली. रामजोशी समाजामध्ये जागृती करण्यासाठी 'क्षत्रिय रामोशी' हे त्रैमासिक पुण्याच्या सत्यशोधक चळवळीतील सक्रीय कार्यकर्त्या सावित्रीबाई रोडे यांनी 1920 मध्ये सुरू केले. त्यांची फारशी दखल कोणी घेतली नाही, याबाबतची खंत व्यक्त करताना प्रा. जयंत विरुळकर लिहितात, भटक्या रामाशो समाजातील स्त्री शिक्षण, विघा आणि ज्ञानाच्या क्षेत्रात भरीव काम करते, हे महाराष्ट्राने आदर्श म्हणून पाहिले पाहिजे होते,''7

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळचा इतिहास आजही जिवंत आहे. राजनिती, राजकारण, संस्कृती, संस्कार, न्यायव्यवस्था, समाजव्यवस्था, अर्थकारण, धर्मव्यवस्था, भाषाज्ञान......इ. क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या मध्ययुगातील स्त्रियांचा नवा इतिहास तयार झाला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र प्रज्ञेने आपली कर्तबगारी बजाविणारी महाराणी ताराबाई, शिवाजी महाराजांच्या सल्लागार जिजाबाई, मराठयांच्या आरमाराकडे बारीक लक्ष देणारी ताराबाई, कोल्हापूरचे राज्य टिकविण्यासाठी धोरण राबविणाऱ्या महाराणी जिजाबाई, तेराकलमी उपदेश देणाऱ्या गोपिकाबाई, पेशवे घराण्यातील राधाबाई पेशवे, लोककल्याणकारी अहिल्याबाई होळकर, स्त्री शिक्षणाचा पाया रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले, स्त्री आणि पुरुष समानतेचे खंडण मंडण करणाऱ्या ताराबाई शिंदे, आत्मावलंबन समृध्दीचा मार्ग सांगणाऱ्या पंडिता रमाबाई, हंटर कमिशन समोर साक्ष देणाऱ्या विठाबाई चौधरी आणि मथुराबाई जोशी. आपलं पाणी आपल्या ओंजळीत प्यायला शिकविणाऱ्या जाईबाई चौधरी, स्त्री कैद्यांसाठी काम करणाऱ्या रमाबाई रानडे, शिक्षणाचा गंध नसणाऱ्या निरक्षर स्त्रीची वाणी पिढयान् पिढया अजरामर ठरलेल्या बहिणाबाई चौधरी, क्षत्रिय समाजात परिवर्तन करणाऱ्या सावित्रीबाई रोडे, आदिवासी दुर्गम भागात शिक्षण प्रचार – प्रसार करणाऱ्या ताराबाई मोडक, संहारा ऐवजी सर्जन आणि सुंदरतेची उपासना निर्मितेची स्वप्न पाहणाऱ्या रूक्कैया हुसेन विवाहितेला स्त्री शिक्षणाची निकड मांडणाऱ्या शेवंताबाई किबें, लोकसाहित्याच्या उपासक दुर्गा भागवत, जातीभेद निवारण करणाऱ्या जनाक्का शिंदे, प्रगल्भतेने नेणारा मार्ग म्हणजे वाचनाचा पुरस्कार करणाऱ्या मालिनीबाई किबे, बदलाचा स्वीकार करणारी मनकर्णिका जोग, स्त्री जीवनाची निकड आणि स्वाभाविक अंगे सांगणाऱ्या गीता साने, स्त्री प्रश्नाचे सामाजिक भाग मांडणाऱ्या मालतीताई बेडेकर, महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीशी संबंधित आनंदीबाई शिर्के, स्त्रियांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या विमलाबाई बागल, स्वातंत्र्य, समता आणि न्यायाचे विवेचन करणाऱ्या इरावती कर्वे, वाङमयीन संवाद घडविणाऱ्या कुसुमावती देशपांडे आणि लोकपरंपरेतील अनाम स्त्रियांच जगणं मांडणाऱ्या अरूणा ढेरे यांनी स्त्रियांचा खुप मोठा कालपट आपल्या पुस्तकातून मांडून नविन पिढीला कार्यप्रवण करणारा आहे.

स्त्री साहित्यक बहिणाबाई चौधरीची गाणी, इरावती कर्वे लिखित ''युगांन्त आणि परिपुर्ती,'' कुसुमावती देशपांडेचे ''दिपकळी, दिपदान आणि मराठी कादंबरीचे पहिले शतक, गीता साने यांचे ''भारतीय स्त्रीजीवन आणि दीपस्तंभ, आशा सावे यांचे पानाआडचे फुल, मालतीताई बेडेकर आणि लोकसाहित्याच्या उपसाक दुर्गा भागवत याच्या लेखाणातुन त्यावेळची स्त्री अनुकुल आणि प्रतिकुल सामाजिक, राजकीय, शैक्षणिक वातावरण समजते. लोकपरंपरेतील अनाथ स्त्रियांच्या आयुष्याचे लेखन करताना स्त्रियांच्या आयुष्याची अभिव्यक्ती अभंग, ओवी, लोकगीतातून कशा पदध्तीने झालेली आहे हे सांगतात, तर त्याच्या साहित्याची परिणामकारकता लेखिकेला अभिजात साहित्यापेक्षा जास्त मोठी वाटतात. 'केन्द्र आणि परीघ' या लेखातील वाक्य खुप महत्वाचे आणि अर्थपूर्ण वाटते. ''मुळात बाई असणं आणि बाई असून पुरूषासारखे लिहिणं, जगातील कोणत्याही संस्कृतिला मान्य नाही. कविता हा खरं तर अंतर्मनाचा आविष्कार असतो.''**8**

लेखिकेने त्या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेमध्ये जे एकच एक वाक्य उद्धृत केलेले आहे, ते मार्मिक आणि स्त्रियांचा कार्य आणि कर्तृत्वाचा अचुक वेध घेणारे आहे.

उदा. मुक्त विचार हाच संस्कृतीचा आधार–दुर्गा भागवत,

शिक्षणाने उन्नतीचे मार्ग दिसु लागतात, सावित्रीबाई रोडे

स्वतःच्या विकासासाठी स्वतंत्र विचारांची आवश्यकता – रमाबाई रानडे

कठोर आत्मपरीक्षण ही आत्मविकासाची पहिली पायरी–ताराबाई मोडक

स्त्रियांचा दुरावस्था, पुरूषप्रधान समाज व्यवस्थेमुळेच–ताराबाई शिंदे

स्त्रियांचा सुधारणा करणार की होऊ देणार – आनंदीबाई शिर्के

जाचक मर्यादा ओलांडल्या, पण स्त्रीची प्रतिष्ठा उंचावली – विमलाबाई बागल

ज्ञान हे पशुजीवनाकडून मनुष्य जीवनाकडे जाण्याचे साधन – सावित्रीबाई फुले.... इ. अनुक्रम लेखिकेच्या शैलीचे विशेष नोंदविते.

कोणत्याचा प्रकारच्या शाब्दीक जंजाळात लेखिकेचे शब्द किंवा भाषा अडकत नाही. कोणत्याही प्रकारच्या अलंकारीतेचा किंवा दुर्बोध भाषेचा वापर न करता कर्तृत्ववान स्त्रियांचा आयुष्यात घडलेले प्रसंग लेखिका कथन करताना दिसते. शिवाय निवडलेले प्रसंग हे त्या स्त्री जीवनाला कलाटणी देणारी ठरल्यामुळे त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला उजाळा देणारे ठरले आहे. साध्या सोप्या भाषेत लेखिका हे मांडत जाते. मांडताना देखील कोणत्याही प्रकारचा फाफट पसारा न मांडता कमीत कमी शब्दांत ती जास्तीत जास्त अर्थ सांगते. हे प्रतिभावान लेखिकांचे खुप मोठे यश म्हणता येईल.

1. 'जाणिवा जाग्या होताना' या पुस्तकामधून अनेक कर्तृत्ववान स्त्रियांची नावे आणि कार्याची माहिती मिळते.
2. काळाचा आढावा घेताना त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीची माहिती मिळते.
3. स्त्रियांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन, काळानुरूप होत गेलेल्या बदलाचा मागोवा घेता येतो.
4. स्त्रियांनी धार्मिक, सामाजिक, शैक्षणिकतेसाठी केलेल्या कार्यातून स्त्रीकडे पहाण्याच्या दृष्टीतील बदल नोंदवता येतो.
5. स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्यातून रूढी, परंपरा, स्त्री–पुरूष मानसिकता, तिचे दबलेले भावनामन, त्यांचा मोकळा हुंकार सर्व पातळयांवरील समानतेचे दार ठोठवताना दिसते.
6. 'जाणिवा जाग्या होताना' या पुस्तकामुळे स्त्रियांच्या इतिहासाला नवा आयाम प्राप्त झाला. स्त्रियांच्या गौरवशाली इतिहासाच्या योगदानात नवी भर घातली.

संदर्भ ग्रंथसुची;


1. 'जाणिवा जाग्या होताना'– अरुणा ढेरे, लोकवाङ;मय गृह सुरेश एजन्सी प्रथमावृत्ती२०१९ पृ.६
2. कित्ता पृ.८
3. अरूणा ढेरेंची 'विस्मृतीचित्रे!' myboli.com मृखपृष्ठ शोभना ताई on २३ डिसेंबर २०१२.००.१९
4. https://www.loksatta.com/lokrang fस्त्रियांच्या विचार क्षमतेचा पट – लोकसत्ता २२ मार्च २०१५ पृ. ९
5. समाजातील स्थान आणि भूमिका – अनुसया लिमये, चिटणीस प्रकाशन, समाजवादी महिला सभा, पुणे पृ. ११
6. ''स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा विचार डा. शोभा पाटील स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २००७ पृ. ४३
7. सत्यशोधक विद्यादेवी सावित्रीबाई रोडे यांचे सामाजिक कार्य ; प्रा. जयंत विरुळकर Asmita ISSN-2277-5730-July-Sep 2020. पृ. ४७
8. आंबेडकरी स्त्री साहित्य : काही विचार, उषा अभोरे, धनसरे पब्लिकेशन प्रथमावृत्ती, ०६ डिसेंबर २०१६ पृ. ६४